# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, ३०२३३४४२/४३ फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : dtedesk2@gmail.com Internet : http://www.dtemaharashta.gov.in


क्रमांक : २/एनजीसी/आर्किटेक्चर/मान्यता/२०१८/ 630

दिनांक :

28 JUN 2018

प्रति,
प्राचार्य,
वसंतदादा पाटील प्रतिष्ठानचे,
मनोहर फाळके कॉलेज ऑफ
आर्किटेक्चर, वसंतदादा पाटील
एज्युकेशनल कॉम्प्लेक्स, ईस्टर्न
एक्सप्रेस हायवे, सायन-चुनाभट्टी,
मुंबई - ४०० ०२२

Vasantdada Patil Pratishthan's
Manohar Phalke College of Architecture
Inward No : 007
Date : 28/06/18

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून कायम विना-अनुदान तत्त्वावर वास्तूशास्त्र अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्याबाबत.

संदर्भ :१. वास्तुकला परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. सीए/५/ॲकॅडेमिक-ॲप/ एन/ एमएच/ २०१७/ १०३५-एमएच१०४, दि.२३.०६.२०१८

२. शासन निर्णय क्र. टीईएम-२०१८/प्र.क्र.२५०/तांशि-४, दि. २७ जून, २०१८.

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून कायम विना-अनुदान तत्वावर वास्तूशास्त्र अभ्यासक्रमाची नवीन संस्था खाली दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १ | बी.आर्च. | ४० |

आपल्या संस्थेने शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व इतर अटी यांचे पालन करण्याबाबत नोंदणीकृत हमीपत्र प्रपत्र “अ” व “ब ” या संचालनालयास सादर केलेले आहे. आपल्या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून कायम विना अनुदान तत्वावर वास्तूशास्त्र अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास नियतठेव म्हणून **रु १२.०० लाख खाते क्र. ००२९५२७१००००३० दि. २७.०६.२०१८, अन्वये बँक ऑफ इंडिया, शाखा-महेश्वरी उद्यान**, येथे संस्थेचे अध्यक्ष व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात १० वर्षासाठी जमा केलेले आहेत.

संदर्भांकित शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती सह खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून कायम विना अनुदान तत्वावर वरीलप्रमाणे वास्तूशास्त्र अभ्यासक्रमाची नवीन संस्था

सुरु करण्यास व संबंधित विद्यापीठाची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद / वास्तूकला परिषद तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

२. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या संकेतांक क्रमाक व पासवर्डद्वारे शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी अद्ययावत करतील.

३. शासनाने, या संचालनालयाने, **मुंबई विद्यापीठ, मुंबई** व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली / वास्तूकला परिषद यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासन / अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली / वास्तूकला परिषद, नवी दिल्ली यांना राहतील.

४. वास्तूशास्त्र अभ्यासक्रमाच्या संदर्भात वास्तूकला परिषद, नवी दिल्ली यांची मान्यता घेणे बंधनकारक राहील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे आपणास बंधनकारक राहील.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत- मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. मा. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई.
३. **कार्यासन क्र. २अ** मुख्य कार्यालय, मुंबई.
४. कार्यासन क्र.३, (आय.टी.सेल) मुख्य कार्यालय, मुंबई
५. निवड नस्तीस.